


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे





•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक १७८ •शनिवार, दि. २७ सप्टेंबर २०२५ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रूपये

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955

### नवरात्र उत्सव

सहावी माळ



*षष्ठीचे दिवशी भक्ता*
*आनंद वर्तला हो*
*घेउनि दिवट्या हाती*
*हर्षे गोंधळ घातला हो*
*कवडी एक अर्पिता*
*देशी हार मुक्ताफळा हो*
*जोगवा मागता प्रसन्न*
*झाली भक्त कुळा हो*
*।।६।।*
*उदो बोला उदो अंबाबाई*
*माऊलीचा हो ।*
*उदोकारें गर्जती काय*
*महिमा वर्णु तिचा हो ।*
*उदो बोला उदो अंबाबाई*
*माऊलीचा हो ।। ध्रु ।।*

# अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे आयुष्य उध्वस्त झाले

## सरकारने केवळ घोषणा न करता तातडीने निर्णय घ्यावा : आ.जयंत पाटील



**बीड । प्रतिनिधी**

मराठवाड्यासह बीड जिल्ह्यात अतिवृष्टी झाल्याने शेतकरी पूर्णपणे उध्वस्त झाला आहे. त्यामुळे सरकारने तातडीने ठोस मदत करावी, अशी मागणी आ.जयंत पाटील यांनी केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे माजी प्रदेशाध्यक्ष आ.जयंत पाटील हे शुक्रवार (दि.२६) रोजी बीड जिल्ह्यातील अतिवृष्टी झालेल्या भागाचा दौरा करण्यासाठी आले होते. यावेळी पत्रकार परिषद घेऊन त्यांनी शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई देण्याची मागणी केली आहे.

यावेळी बोलताना आ.जयंत पाटील म्हणाले की, अतिवृष्टीमुळे शेतकरी पूर्णपणे उध्वस्त झाला आहे. मराठवाड्यात बहुतेक ठिकाणी सामान्य अतिवृष्टी झाली नसून सर्वच गावे पाण्याखाली गेली आहेत. जनावरे वाहून गेली आहेत. काही जनावरे जागेवरच दगावली आहेत.शेळ्या मेंढ्या वाहून गेल्या आहेत. घरामध्ये पाणी शिरल्याने सर्व वस्तू साधने वाहून गेली आहेत. घरे वाहून गेली आहेत. त्यामुळे शासनाने चार पाऊल पुढे येऊन शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करावी. शेतकऱ्यांच्या शिवारात उभे असलेले सोनेरी पीक काही क्षणांत नष्ट झाले. शेतकरी डोळ्यांत अश्रू घेऊन आपला संसार उद्धवस्त होताना बघत आहे. सरकारने शेतकऱ्यांना पंचनाम्याच्या प्रक्रियेत अडकवून अधिक मानसिक छळ

▶▶ उर्वरित पान २ वर

### • शेतकऱ्यांना एकरी किमान ५0 हजार रुपयांची मदत तातडीने द्यावी

**अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. काही दिवसांपासून सुरु असलेल्या अतिवृष्टीने शेतकरी हवालदिल झाला आहे. त्यामुळे एकरी किमान ५० हजार रुपये इतकी थेट मदत तातडीने दिली पाहिजे. सरकारने हप्ते पडून २५ हजार रुपयांचा पहिला हप्ता दिला पाहिजे.**

### • गायी म्हशी साठी ६0 ते ७0 हजारांची तर शेळ्या मेंढ्या साठी नुकसान भरपाई द्या

**अतिवृष्टीमुळे शेतीसह जनावरांचे देखील मोठे नुकसान झाले आहे. मोठ्या प्रमाणात जनावरे वाहून गेली आहे. जनावरांच्या किंमती वाढलेल्या आहेत. बाजारात सध्या ०१ लाख २० हजार पर्यंत गायी म्हशींची किंमत आहे. सरकारने किमान ६० ते ७० हजार रुपये गायी म्हशीं ज्या वाहून गेल्या आहेत त्याची नुकसान भरपाई द्यावी, शेळ्या मेंढ्या साठी १० हजार रुपये द्यावेत.**

### • ज्यांच्या जमिनी खरडून वाहून गेल्या त्यांना एकरी ३0 हजार मदत द्या

**अनेक भागात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या जमिनी वाहून गेल्या आहेत. जमिनी खरडून गेल्या आहेत. त्यांना शासनाने एकरी ३० हजार रुपयांची मदत द्यावी. यासोबतच नदी पात्रालगत संरक्षण भिंत बांधून द्यावी अशी मागणी आ. जयंत पाटील यांनी केली आहे.**

## यश ढाका खून प्रकरणातील आरोपींना अटक करा

### • पोलीस ठाण्यासमोर रास्ता रोको



**बीड । प्रतिनिधी**

किरकोळ कारणावरून दोन तरुणात वाद निर्माण झाल्याने एका तरुणास चाकुने भोसकून त्याचा निर्घृणपणे खून करण्यात आल्याची खळबळजनक घटना रात्री साडेआठ वाजण्याच्या दरम्यान शहरातील माने कॉम्प्लेक्स परिसरात घडली. या प्रकरणी एक आरोपी पोलिसांनी अटक केला असून या प्रकरणात आणखी आरोपी असून त्यांनाही अटक करण्यात यावी या मागणीसाठी सकाळी मयताच्या नातेवाईकांनी शिवाजीनगर पोलिस ठाण्यासमोर ठिय्या आंदोलन सुरू केले होते. जोपयरत अटक होत नाही तोपयरत शवविच्छेदन करू दिले जाणार नाही, असा आक्रमक पवित्रा नातेवाईकांनी घेतला होता.

गेल्या काही दिवसांपूर्वीच पालवण चौक परिसरातही मित्रानेच मित्राचा निर्घृणपणे खून केला होता. त्या घटनेला काही दिवस उलटत नाही तोच रात्री पुन्हा एकदा खुनाची घटना घडली. पत्रकार देवेंद्र ढाका यांचा मुलगा यश देवेंद्र ढाका (वय २१ वर्षे, रा. बलभीमनगर बीड) ▶▶ उर्वरित पान २ वर

## 10 वर्षाचा चिमुकला पुराच्या पाण्यात गेला वाहून; कुटुंबीयांच्या डोळ्यातून अश्रूंच्या धारा थांबेना

**बीड । प्रतिनिधी**



बीड जिल्ह्यात आठवडाभरापासून जोरदार पाऊस सुरु आहे. यामुळे आतोनात नुकसान झाले असून अनेकांचा जीव देखील गेला आहे. दरम्यान बीडमध्ये झालेल्या अतिवृष्टी आणि धुवाधार पावसामुळे संपूर्ण जनजीवन विस्कळीत झाले असताना पुराच्या पाण्यात दहा वर्षाचा मुलगा वाहून गेल्याची धक्कादायक घटना पिंपळवाडी येथे घडली आहे. या घटनेने कुटुंबावर मोठा आघात पोहचला असून त्यांच्या डोळ्यातील अश्रू थांबत नाहीत. बीड जिल्ह्यात सर्वत्र जोरदार ▶▶ उर्वरित पान २ वर

## उपमुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे यांच्या नेतृत्वात मदतग्रस्तांना जीवनावश्यक वस्तूंची मदत वाटप

**बीड । प्रतिनिधी**



मराठवाड्यातील अतिवृष्टी मुळे अनेक गावे उद्धवस्त झाली आहेत. पुरामुळे शेतीसह सामान्य नागरिकांचे जीवन अस्तव्यस्त झाले आहे. रस्ते व पूल बाधित झाल्याने काही गावांचा संपर्क तुटला होता. मात्र तत्काळ मदत पोहोचविण्याचे काम सुरू ठेवण्यात आले आहे. या आपत्तीग्रस्तांना मदतीचा हात देण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे साहेब यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना व युवासेनेच्या वतीने जीवनावश्यक वस्तू, अन्नधान्य, पाणी बॉटल्स, औषध साहित्य, आरोग्य साहित्याचे वाटप करण्यात आले. ▶▶ उर्वरित पान २ वर


## स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांची गुटखा व सुगंधी तंबाखू विरोधात मोठी कारवाई

**बीड । प्रतिनिधी**



मा.पोलीस अधीक्षक, बीड श्री.नवनीत काँवत यांनी अवैध धंद्यावर कारवाई करण्याचे आदेश दिल्यावरून स्थानिक गुन्हे शाखा, बीड येथील पोलीस निरीक्षक श्री.शिवाजी बंटेवाड यांच्या पथकाला महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधक केलेला व अवैधरित्या विक्रीसाठी आणलेला गुटखा व सुगंधी तंबाखू पकडण्यात मोठे यश आले आहे. सदरची कारवाई ही मसाजोग, ता.केज, जि.बीड येथे करण्यात आली आहे. या कारवाईदरम्यान स्थानिक गुन्हे शाखेच्या पाथकाने एकूण ₹ ३४,४६,२२७/- किमतीचा गुटखा ▶▶ उर्वरित पान २ वर

## पुरात वाहून गेलेल्या शिंदेवाडी येथील महिलेच्या कुटुंबाला आर्थिक मदत



**आष्टी । प्रतिनिधी**

तालुक्यातील शिंदेवाडी येथील शनिवारी (दि.२०) भाग्यश्री गोपाळ खंडागळे (वय ४५) या शेतातून घरी परतत असताना माळेवाडी नदीच्या पुरात वाहून गेल्याने निधन झाले. त्यांच्या कुटुंबियांना आ. सुरेश धस यांच्या हस्ते ४ लाखांचा आर्थिक मदतीचा धनादेश सुपूर्द करण्यात आला. या घटनेबाबत आ. सुरेश धस यांनी तहसीलदार वैशाली पाटील यांना तातडीने या कुटुंबाला आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत मदत देण्याच्या सूचना दिल्या होत्या. खंडागळे कुटुंबियांना नैसर्गिक आपत्तीची तातडीची शासकीय मदत म्हणून ४ लाख रुपयांचा धनादेश आष्टी, पाटोदा, शिरूर तालुक्याचे आ. सुरेश धस हस्ते देण्यात आला. यावेळी तहसीलदार वैशाली पाटील, नायब तहसीलदार मोहिते, ग्राम महसूल अधिकारी बाळासाहेब बनगे, सचिन काकडे, सचिन पवार ▶▶ उर्वरित पान २ वर

## खून ते लूटमार प्रकरण! वाल्मीक कराड समर्थक गोट्या गित्तेसह पाच जणांवर मकोका कायम

**बीड । प्रतिनिधी**



परळीत सहदेव सातभाई यांच्या खुनाचा प्रयत्न आणि लूट प्रकरणात बीड पोलिसांनी वाल्मीक कराड समर्थक रघुनाथ फड गँगवर मकोका अंतर्गत कारवाई केली होती. यात सातपैकी पाच जणांवरील मकोका मागे घेण्यात आला होता. आता पुन्हा या पाचही जणांवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. वाल्मीक कराडचा राईट हँड म्हणून ओळखला जाणारा गोट्या गित्तेवर मकोका कायम ठेवण्यात आला आहे. नंदागौळ येथील रहिवासी असलेल्या गोट्या गीत्तेवर खून, खुनाचा प्रयत्न, खंडणी असे १० ते १५ गंभीर गुन्हे नोंद असून तो अद्याप फरार आहे. गोट्या गित्तेसह जगन्नाथ फड, संदीप सोनवणे, बालाजी दहिफळे आणि विलास गिते या पाच जणांवरील मकोका रद्द

▶▶ उर्वरित पान २ वर

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची २८ सप्टेंबर रोजी होणारी परीक्षा पुढे ढकला : डॉ. ज्योती मेटे

**बीड । प्रतिनिधी**



महाराष्ट्रात झालेल्या अतिवृष्टीमुळे पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. याचा मोठा परिणाम रस्ते वाहतुकीवर झाला आहे. सद्यस्थितीत हवामान विभागाने तीन दिवस राज्यात दिलेल्या पावसाच्या रेड अलर्ट मुळे आणखीनच गंभीर परिस्थिती निर्माण होऊ शकते यातच २८ सप्टेंबर २०२५ रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोग (चझडउ) ची परीक्षा आयोजित करण्यात आली आहे. या परीक्षार्थी विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी आयोगाची पूर्वपरीक्षा पुढे ढकलण्यात यावी. अशी मागणी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्याकडे शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी केली आहे. संपूर्ण राज्यात पूरसदृश्य स्थिती

▶▶ उर्वरित पान २ वर

# अतिवृष्टीच्या पंचनाम्यात दुजाभाव कराल तर याद राखा

## खा.बजरंग सोनवणे यांचा इशारा, पाटोदा, आष्टी तालुक्यात केली नुकसानीची पाहणी

**बीड । प्रतिनिधी**



मराठवाड्यात अतिवृष्टीने थैमान घातले आहे. शेतकरी संकटात सापडला आहे. त्यांना शक्य तितकी मदत करणे गरजेचे आहे. असे असताना काही अधिकारी पंचनाम्यात दुजाभाव करण्याचे पातक करत असल्याचे दिसत आहे. अधिकाऱ्यांनी ओल्या दुष्काळात सापडलेल्या शेतकऱ्यांसोबत माणूसकीने वागावे, दुजाभाव कराल तर याद राखा, असा इशारा खा.बजरंग सोनवणे यांनी दिला आहे.

राष्ट्रवादीचे जेष्ठ नेते जयंत पाटील हे दि.२६, शुक्रवारी रोजी बीड जिल्ह्यातील अतिवृष्टीतील नुकसान पाहणी दौऱ्यावर आले होते. यावेळी खा.बजरंग सोनवणे यांनी सकाळी पाटोदा शहरात भेटी देवून तेथील पुरपरिस्थतीने झालेल्या नुकसानची पाहणी केली. यानंतर ते कारेगाव येथे नुकसानीच्या पाहणीसाठी पोहचले. याठिकाणी जेष्ठ नेते जयंत पाटील, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, युवक प्रदेशाध्यक्ष महेबूब शेख, पाटोदा तालुकाध्यक्ष आनंद जाधव, माजी आमदार संगीता ठोंबरे, सुशीला मोराळे, राजेसाहेब देशमुख, यांची उपस्थिती होती. यानंतर त्यांनी डोंगरकिन्ही येथे भेट दिली. तर आष्टी तालुक्यातील धामनगाव, कडा, चोभानिमगाव, शिराळ या गावात अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची पाहणी केली. यावेळी अण्णासाहेब चौधरी, जिल्हा उपाध्यक्ष सतीश शिंदे, राम खाडे, आष्टी तालुका अध्यक्ष ▶▶ उर्वरित पान २ वर



# स्वस्थ नारी, सशक्त परिवार – महिलांना आरोग्य साक्षरतेकडे नेणारा मार्ग

केंद्र सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय आणि महिला व बाल विकास मंत्रालयाच्या संयुक्त विद्यमाने १७ सप्टेंबर २०२५ (पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५व्या वाढदिवसानिमित्त) ते २ ऑक्टोबर २०२५ (गांधी जयंती) या कालावधीत 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' हे अभियान राबविले जात आहे. या अभियानाचा मुख्य उद्देश महिलांचे आरोग्य, पोषण आणि कुटुंब कल्याणाला बळकटी देणे आहे. जिल्हा आणि महानगरपालिका स्तरावर आयुष्मान आरोग्य मंदिरे, प्राथमिक आरोग्य केंद्रे, सामुदायिक आरोग्य केंद्रे आणि अंगणवाड्यांमध्ये विशेष आरोग्य शिबिरे आयोजित केली जात आहेत. या ठिकाणी महिलांसाठी मोफत तपासणी, लसीकरण आणि समुपदेशन उपलब्ध आहे. यातून महिलांना आरोग्य साक्षर करण्याचा प्रयत्न यशस्वी होताना दिसत आहे.




शहरी, ग्रामीण आणि आदिवासी भागांमध्ये लाखो महिलांना मोफत आरोग्य सेवा पुरवल्या जात आहेत. या अभियानात सहभागी होण्यासाठी नागरिक आरोग्य शिबिरांना भेट देऊ शकतात, जिथे आयुष्मान आरोग्य मंदिरे, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि अंगणवाड्यांमध्ये विशेष तपासण्या, लसीकरण आणि समुपदेशन उपलब्ध आहे. महिलांना स्थानिक आरोग्य केंद्राशी संपर्क साधून या शिबिरांची माहिती मिळवता येईल. आरोग्य विभाग जनजागृती मोहिमेद्वारे कुटुंबातील महिलांना प्रोत्साहन देत आहे. राष्ट्रीय पोषण महिन्यात पोषण, मासिक पाळी स्वच्छता आणि कुटुंब नियोजनावर व्याख्यानेही आयोजित केली जात आहेत.

अभियानाचा महत्त्वाचा पैलू म्हणजे महिलांच्या आरोग्याला प्राधान्य देऊन दीर्घकालीन सामाजिक बदल घडवणे. यामध्ये उच्च रक्तदाब, मधुमेह, स्तन आणि गर्भाशयाचा कर्करोग, क्षयरोग, कुष्ठरोग, ॲनिमिया आणि सिकल सेल रोग यांची मोफत तपासणी करून आजारांची लवकर ओळख आणि उपचार शक्य होत आहेत. यामुळे मृत्यूदर कमी होऊन कुटुंबे मजबूत होत आहेत. गर्भवती महिलांसाठी हिमोग्लोबिन तपासणी, लसीकरण, प्रसूतीपूर्व काळजी आणि जननी शिशु सुरक्षा योजना तसेच जननी सुरक्षा योजनेंतर्गत मोफत सेवा देऊन माता-शिशू मृत्यूदर कमी करण्यावर भर आहे. तसेच, पोषण आणि जागरूकता सत्रांद्वारे संतुलित आहार, स्वच्छता आणि कुटुंब नियोजनाचे शिक्षण देऊन कुपोषण दूर होत आहे. प्रत्येक स्त्रीला आरोग्यविषयक आवश्यक सहाय्य आणि मोफत आरोग्य सेवा उपलब्ध करून तिला आरोग्य साक्षरतेकडे नेण्याचा मार्ग खुला होत आहे.

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तसेच पालकमंत्री कोल्हापूर, प्रकाश आबिटकर यांनी सांगितले की, 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' हे अभियान केवळ आरोग्य तपासणीपुरते मर्यादित नसून, महिलांच्या आणि कुटुंबाच्या आरोग्यदायी भविष्यासाठी एक व्यापक आराखडा आहे. यात फक्त आजारांची तपासणी नव्हे, तर आरोग्य साक्षरता वाढवणे, महिलांचे आरोग्य बळकट करणे आणि कुटुंबातील प्रत्येक घटकाला सशक्त करणे हा उद्देश आहे. हे अभियान एकदाच होणारा उपक्रम नसून, आरोग्य विभागाची निरंतर चालणारी चळवळ आहे. या चळवळीमुळे महिलांचे आरोग्य सुधारेल, कुटुंब सशक्त होईल आणि परिणामी राज्याचा आरोग्य निर्देशांक उंचावेल.

'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' ही संकल्पना महिलांच्या आरोग्य साक्षरतेवर केंद्रित आहे, जी वैयक्तिक आणि कुटुंबाच्या कल्याणासाठी आधारस्तंभ आहे. महिलांना आरोग्याविषयी शिक्षण, जागरूकता आणि सुलभ सेवा मिळाल्यास त्या स्वतःच्या तसेच कुटुंबाच्या शारीरिक आणि मानसिक गरजा समजून योग्य निर्णय घेऊ शकतात. लहानपणापासून मुलींना पोषण, स्वच्छता आणि प्रजनन आरोग्याचे शिक्षण देणे, समुदाय कार्यशाळा आणि मराठीतून डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे माहिती पुरवणे प्रभावी ठरते. ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्य केंद्रे, आशा कार्यकर्त्या आणि मोबाइल क्लिनिक्सद्वारे सेवा पोहोचवल्या जात आहेत. पोषण, मासिक पाळी, गर्भनिरोध आणि मानसिक आरोग्याविषयी जागरूकता वाढवून सामाजिक गैरसमज आणि लिंगभेद दूर करण्याचे काम होत आहे. आरोग्य साक्षर महिला कुटुंबाला संतुलित आहार, स्वच्छता आणि रोगप्रतिबंधक उपाय शिकवतात, ज्यामुळे मुलांचे शिक्षण आणि कुटुंबाची आर्थिक प्रगती साध्य होते. अशा महिलांमुळे सामाजिक बदल घडतो आणि समाज दीर्घकालीन प्रगतीकडे वाटचाल करतो. आरोग्य निर्देशांक वाढवण्याच्या दृष्टीने 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' ही संकल्पना निश्चितच राज्य आणि देशासाठी मैलाचा दगड ठरेल.

◆ पान 9 वरून पुढे...

## अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे....

देण्यापेक्षा सरसकट नुकसान भरपाई द्यावी. आज शेतकरी संकटात आहे. सरकारने केवळ घोषणा न करता तातडीने निर्णय घ्यावा आणि शेतकऱ्यांना न्याय द्यावा, कारण शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी करण्याची हीच योग्य वेळ असल्याचे जयंत पाटील यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

## यश ढाका...

व सुरज आप्पासाहेब काटे (रा. अंबिका चौक, बीड) या दोन तरुणांमध्ये काल वाद निर्माण झाला होता. यांच्यातला वाद रात्री साडेआठ वाजण्याच्या दरम्यान पुन्हा उफाळून आला. या वादातून सुरज काटे याने यश ढाका याचा चाकुने भोसकून खून केला. ही घटना माने कॉम्प्लेक्स परिसरात घडली. या घटनेने बीड शहरात एकच खळबळ उडाली. या प्रकरणी आरोपी सुरज काटे याला शिवाजीनगर पोलिसांनी रात्रीच अटक केली. या प्रकरणात आणखी आरोपी असून त्या आरोपींनाही अटक करण्यात यावी या मागणीसाठी मयताच्या नातेवाईकांनी आज सकाळी शिवाजीनगर पोलीस ठाण्यासमोर ठिय्या आंदोलन सुरू केले . जोपयरत आरोपीला अटक होत नाही तोपर्यंत शवविच्छेदन करू देणार नाही, असा आक्रमक पवित्रा घेतला होता. दुपारी दीड वाजेपर्यंत या प्रकरणाचा तिढा सुटलेला नव्हता. जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून कायदा व सुव्यवस्थेचे धिंडवडे निघत आहे. काही दिवसांपूर्वीच मित्रानेच मित्राचा निर्घृरपणे खून केला होता. या घटनेला काही दिवस उलटत नाही तोच रात्री पुन्हा एक खून झाला आहे.

## 10 वर्षाचा...

पाऊस पडत आहे. साधारण आठ दिवसांपासून पाऊस पडत असल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. तर शेतीतील पिकांसह अन्य वित्त हानी देखील मोठ्या प्रमाणात झाली आहे. तर सततच्या पावसामुळे जिल्ह्यात अनेक भागात आजही पूरस्थिती कायम असल्याचे पाहण्यास मिळत आहे. यात पुन्हा एकदा अतिवृष्टी झाल्याने आलेल्या पुरात एक दहा वर्षीय मुलगा वाहून गेल्याची घटना समोर आली आहे. डोळ्यातील अश्रू थांबेनात- आदित्य कळसाने (वय १०) असे पुरात वाहून गेल्याने मृत्यू झालेल्या मुलाचे नाव आहे. या घटनेने पिंपळवाडी गावावर आणि कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून कुटुंबीय आज ढसाढसा रडत आहे. आमचे सर्वस्व गेलं आहे; आता मदत मागून तरी काय उपयोग. मात्र काहीतरी दिलं पाहिजे अशी मागणीही त्यांनी केली आहे. हे सर्व सांगताना आदित्यच्या आई- वडिलांच्या डोळ्यातील अश्रूंच्या धारा थांबत नव्हत्या.

◆ पान 9 वरून पुढे...

पुराच्या पाण्यात अडकलेल्या ७५ लोकांना सुखरूप काढले बाहेर- बीडच्या सिंधफना नदीकाठच्या कुर्ला गावात दोन वस्त्यांमध्ये ७५ लहान मुलांसह वयोवृद्ध नागरिक अडकले होते. यांना सुखरूप बाहेर काढण्यात एनडीआरएफच्या पथकाला यश आले असून संपूर्ण नागरिक पुराच्या पाण्यातून बाहेर येईपर्यंत गेवराई विधानसभा मतदारसंघाचे आमदार विजयसिंह पंडित हे त्या ठिकाणी तळ ठोकून होते. ज्यावेळेस शेवटचा व्यक्ती बाहेर आला त्याच वेळेस ते तिथून हल्ले सर्व लोकांची काळजी घेण्यासाठी त्यांनी सूचना देखील दिले आणि विचारपूस देखील केली आहे.

## उपमुख्यमंत्री मा.....

ही मदत धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री तथा परिवहन मंत्री मा. प्रतापजी सरनाईक साहेब यांच्या आदेशानुसार, युवासेना मार्गदर्शक खासदार डॉ. श्रीकांतजी शिंदे साहेब व युवासेना कार्याध्यक्ष मा. पुर्वेशजी सरनाईक साहेब मार्गदर्शनाखाली तथा युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण हे देखील यात्रसंगी उपस्थित होते. आपत्तीग्रस्तांपर्यंत जीवन आवश्यक वस्तू पोहोचविण्यात आली आहे. या मदत कार्यामुळे पुरग्रस्तांना मोठा दिलासा मिळाला असून, अन्न व आरोग्य साहित्यामुळे त्यांच्या प्राथमिक गरजा पूर्ण करण्यास मदत झाली आहे. तसेच स्थानिक प्रशासन, स्वयंसेवी, संस्थांबरोबर समन्वय साधून मदत कार्य अधिक परिणामकारक पद्धतीने चाललेली आहे. आदरणीय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या पुढाकारामुळे समाजात सामाजिक बांधिलकी आणि एकतेचा संदेश पोहचला आहे. या संकटकाळात मदतकार्य मिळालेल्या लोकांमध्ये सकारात्मक भावना निर्माण झाली आहे.

## स्थानिक गुन्हे...

व सुगंधी तंबाखूचा साठा जप्त केला. महाराष्ट्र शासनाने गुटखा व सुगंधी तंबाखूच्या विक्रीवर संपूर्ण बंदी घातली असतांना पण आरोपी नामे १) रोहित आसाराम देशमुख, ३५ वर्ष रा. मसाजोग ता. केज व २) साहेबराव लिंबा आंधळे, वय ४५ वर्ष रा.आंधळ्याचीवाडी ता. केज जि.बीड यांनी स्वतःचे ताब्यात बाळगल्याने तो जप्त करण्यात आलेला आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी व अंमलदार यांनी वरील आरोपीविरुद्ध पोलीस स्टेशन केज येथे गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस स्टेशन केज येथील अधिकारी हे करत आहेत. या कारवाईमुळे जिल्ह्यात गुटखा व सुगंधी तंबाखूची अवैध विक्री रोखण्यास मोठा हातभार लागणार आहे. ही कारवाई मा.पोलीस अधीक्षक श्री.नवनीत काँवत, मा.अप्पर

◆ पान 9 वरून पुढे...

पोलीस अधीक्षक श्री.सचिन पांडकर, श्रीमती चेतना तिडके मॅडम यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर पोलीस अंमलदार अनंत मस्के, विकास राठोड, सोमनाथ गायकवाड, अंकुश वरपे, राहुल शिंदे, राख, अश्फाक सय्यद, मनोज परजने, नितीन वडमारे, सिद्धार्थ मांजरे, सुनील राठोड सर्व नेमणूक स्थानिक गुन्हे शाखा बीड यांनी केली आहे.

## पुरात वाहून...

व संतोष खंडागळे हे उपस्थित होते. संकट काळी मदतीचा हात मिळाल्याने खंडागळे कुटुंबांनी आमदार धस व तहसिलदार वैशाली पाटील यांचे आभार मानले.

## खून ते लूटमार...

करण्यात आला आहे. मात्र, आता पुन्हा त्यांच्यावर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. तर टोळीप्रमुख रघुनाथ फड आणि धनराज उर्फ राजाभाऊ फड या दोघांवरच मकोका याआधीच कायम ठेवण्यात आला होता. गेल्या काही काळात बीड जिल्हा गुन्हेगारीच्या घटनांनी बदनाम होत आहे. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या आणि पवनचक्की कंपनीला खंडणी मागितल्याच्या गुन्ह्यात अटकेत असलेल्या वाल्मिक कराडसह त्याच्या टोळीवर मकोका अंतर्गत गुन्हे दाखल दाखल करण्यात आले होता. त्यानंतर जिल्ह्यातील चार वेगवेगळ्या गुन्हेगारी टोळ्यांवर मकोकांतर्गत मोठी कारवाई करण्यात आली होती. या चार गँगपैकी एक असलेल्या फड गँगवर कडक कारवाई करत सात जणांवर मकोका लावण्यात आला होता. आता त्यापैकी पाच आरोपींवरचा मकोका रद्द झाला होता. मात्र, आता पुन्हा या पाचही जणांवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. वाल्मीक कराडचा राईट हँड म्हणून ओळखला जाणारा गोट्या गित्तेवर मकोका कायम ठेवण्यात आला आहे.

बीडच्या परळीतील छत्रपती शिवाजी महाराज चौकात १८ ऑक्टोबर २०२३ रोजी तडोळी येथील शेतकरी सहदेव सातभाई यांच्यावर खुनी हल्ला करण्यात आला होता. हल्लेखोरांनी त्यांना जीव घेण्याच्या उद्देशाने लोखंडी रॉड, फरशी आणि काठीने मारहाण केली होती, ज्यात ते गंभीर जखमी झाले. हल्ल्यानंतर सहदेव सातभाई यांच्या खिशातील २ लाख ७० हजार रुपये जबरदस्तीने काढून घेतले, तसेच त्यांना शिवीगाळ करत जिवे मारण्याच्या धमक्या देण्यात आल्या. या प्रकरणात वाल्मिक कराडचा राईट हँड गोट्या गिते, जगन्नाथ फड, संदीप सोनवणे, बालाजी दहिफळे, विलास

◆ पान 9 वरून पुढे...

गिते, रघुनाथ फड, धनराज उर्फ राजाभाऊ फड या सात जणांवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली होती.

## महाराष्ट्र लोकसेवा...

निर्माण झाली असून, अनेक ठिकाणी शेतकऱ्यांचे शेती आणि मालमत्तेचे मोठे नुकसान झाले आहे. अतिवृष्टीमुळे अनेक ठिकाणी रस्ते पाण्याखाली गेले आहेत. रस्ते , पुलांचे मोठे नुकसान झाले आहे. यामुळे बहुतांश भागात वाहतूक व्यवस्था पूर्णपणे ठप्प झाली आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे लाखो विद्यार्थ्यांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. यातच २८ सप्टेंबर २०२५ रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोग (चझडड) ची परीक्षा आयोजित करण्यात आली आहे. या परीक्षेच्या नियोजित परीक्षा केंद्रांवर विद्यार्थ्यांना वेळेत पोहोचणे शक्य होणार नाही.या परिस्थितीची दाहकता आणि विद्यार्थ्यांची गैरसोय लक्षात घेता, विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून दि २८ सप्टेंबर २०२५ रोजी होणारी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची पूर्वपरीक्षा पुढे ढकलण्यात यावी अशी मागणी डॉ.ज्योती मेटे यांनी केली आहे.

## अतिवृष्टीच्या पंचनाम्यात...

सुनील नाथ, अमोल तरटे, शेख रिझवान, संजय थोरवे, अशोक पोकळे, जगनाथ ढोबळे, राहुल काकडे यांच्यासह तालुक्यातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले, जिल्ह्यात सर्वत्र अतिवृष्टी झाली आहे. लोक एकमेकांना मदतीचा हात देवून माणूसकी दाखवत आहे. अशा परिस्थतीत माणूसकी दाखविणे आवश्यक आहे. असे असताना काही अधिकारी, कर्मचारी पंचनाम्यात दुजाभाव करत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. असे असेल तर ही पध्दत चुकीची आहे. पंचनामे योग्य पध्दतीने झाले नाही अथवा दुजाभाव केला तर सामान्य शेतकरी मदतीपासून वंचित राहू शकतात. अशावेळी अधिकारी-कर्मचाऱ्यांनी दुजाभाव न करता पंचनामे करावेत. जर पंचनाम्यात दुजाभाव केला अशी तक्रार आली तर याद राखा, दुजाभाव करण्याचे पातक करू नका, असा सल्लाही खा.बजरंग सोनवणे यांनी दिला. दरम्यान, बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून पंचनामे करण्यात वेळ वाया घालविण्यापेक्षा सरसकट मदत द्यावी, जिथे शेतात माती राहिली नाही, पिके सडलेली दिसत आहेत, तिथे पंचनामे कशाचे करायचे, इतके तरी सत्ताधारी मंडळींनी लक्षात घेणे आवश्यक आहे, असेही खा.सोनवणे म्हणाले.

◆ पान ४ वरून पुढे...

## उपमुख्यमंत्री अजित....

नगरपरिषदेला त्वरित पुढील प्रक्रिया करण्याचे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत. वचनपूर्तीचा आदर्श- बीडकरांचे दादांना सलाम- या निर्णयामुळे बीड शहरात आनंदाचे वातावरण असून, अजितदादांनी दिलेला शब्द पाळला, ही केवळ घोषणा नव्हे, तर कृतीतून दाखवलेली वचनपूर्ती आहे, अशा प्रतिक्रिया नागरिकांतून उमटत असून नागरिक दादांचे आभार व्यक्त करत आहेत. विकासाची नवी दिशा- हा निधी मंजूर होणं म्हणजे केवळ रस्त्याचं काम सुरू होणं नव्हे, तर बीडच्या विकासाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचललं जाणं आहे.अजित पवार यांचं दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व तसेच अमर नाईकवाडे आणि फारूक पटेल यांची लोकाभिमुख तळमळ, यामुळे बीड शहरासाठी ही एक ऐतिहासिक घडामोड ठरणार आहे.

## बीड जिल्ह्यातील....

लिप्टच्या वर सेप्टी बॅरिकेट बसविलेले नाहीत. मोटरला एमरजंन्सी ब्रेक बसविलेले नाहीत. एमरजंन्सी ब्रेकचे काम लिप्ट अडकल्याच्या नंतर त्याचा वापर केला जातो. लिप्टला चक्कर प्लेट बसविलेली नाही. लिप्टच्या चक्कर प्लेटचे काम सेप्टी नाही. लिप्टला खड्ड्यामध्ये जी सेप्टी असते ते बफर स्प्रिंग बसविलेली नाही. बीड जिल्ह्यातील देखभाल दुरूस्तीचे रेकॉर्ड जिल्ह्यातील अधिकाऱ्यांकडे उपलब्ध नाही. नवीन लिप्टला परवानगी देण्याची जागेवर जाऊन वार्षिक तपासणी करण्याची जबाबदारी ऊर्जा विभागाच्या अंतर्गत असते. परंतु बीड मधील कोर्ट तसेच हॉस्पिटल जिल्ह्यातील सरकारी ऑफीस, कार्यालय, घरगुती बिल्डींग्स, अपार्टमेंट बीड मधील या सर्व जागेत चुकीच्या पध्दतीने लिप्टचे अर्धवट कामे करून लिप्ट बसविण्यात आलेले आहेत व जिल्ह्यातील सर्व लिप्ट धारकांना लिप्टचे डुप्लीकेट परवाने काही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी व ठेकेदारांनी दिले आहेत.. यामध्ये लिप्ट अचानक बंद पडली व काही दुर्घटना घडली तर याला जबाबदार कोण? दि.०३/०८/२०२५ रोजी शिवाजीराव हार्ड केअर ॲण्ड इमेजिंग सेंटर बीड या हॉस्पिटलमध्ये मराठा योध्दा मा. मनोज (दादा) जरांगे पाटील यांच्यासोबत या हॉस्पिटलच्या लिप्टमध्ये दुर्घटना घडली होती. त्यामध्ये जर लिप्टचे पूर्णपणे काम व्यवस्थित केलेले असते तर अशा होणाऱ्या लिप्टमध्ये होणाऱ्या दुर्घटना घडल्या नसत्या. शिवाजीराव हार्ड केअर ॲण्ड इमेजिंग सेंटर बीड या हॉस्पिटलचे लिप्टचे लाईसन्स नसून सुध्दा लिप्ट चालू आहे. या निष्काळजीपणाला कोणते अधिकारी व ठेकेदार जबाबदार कोण? बीड जिल्ह्यामध्ये ३०० ते ४०० लिप्ट चुकीच्या पध्दतीने अर्धवट कामे करून बसविलेले आहेत व त्यामध्ये प्रत्येक लिप्ट धारकाला कलर झेरॉक्स काढून डुप्लीकेट लाईसन्स दिले आहेत. यामध्ये हा सर्वकाही चुकीच्या पध्दतीचा पैशाचा लुटमारी कारभार या बीड जिल्ह्यातील वरीष्ठ अधिकाऱ्यांसोबत मिळून केला आहे. बीड जिल्ह्यामध्ये सरकारी ऑफीस कार्यालय, सर्व हॉस्पिटल्स, घरगुती बिल्डींस व अपार्टमेंट या जागेत ज्या काही लिप्ट बसविलेल्या आहेत. त्या प्रत्येक लिप्टची पाहणी करून व त्या प्रत्येक लिप्ट धारकाचे लायसन्स व्हेरीफाय करून ते ओरिजनल आहेत की

◆ पान ४ वरून पुढे...

डुप्लीकेट पाहण्यात यावेत व ज्या लिप्टधारकाचे काम अपूर्ण व लायसन्स नाहीत त्या लिप्ट तात्काळ बंद करण्यात याव्यात व बीड जिल्ह्यातील वरिष्ठ अधिकारी व ठेकेदार यांच्यावर तात्काळ कार्यवाही करून या ठेकेदारांची लायसन्स रद्द करण्यात यावेत व यांच्या अर्धवट कामामुळे लिप्ट मध्ये होणाऱ्या दुर्घटना घडतील.

## बीडच्या चार ...

अक्षय नरवडे व पठाण शाहरुख यांनी खेळाडूंचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यास शुभेच्छा दिल्या.

## पुरस्थितीमुळे राज्यसेवा...

मराठवाड्यातील प्रत्येक विद्यार्थ्याची मूलभूत अपेक्षा आहे. सद्य परिस्थितीत विद्यार्थ्यांची मानसिक अवस्था देखील तणावपूर्ण आहे. अशा बिकट परिस्थितीत परीक्षा घेणे म्हणजे विद्यार्थ्यांवर अन्याय होईल. त्यामुळे आयोगाने या परिस्थितीची गांभीर्याने दखल घेऊन राज्यसेवा पूर्व परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घ्यावा, असे पत्रात म्हटले आहे. सदरील पत्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांनाही पाठविण्यात आले आहेख़ा.बजरंग सोनवणे हे सर्व विषयांवर लक्ष ठेवून आहेत.

## उपासमारीच्या छायेत...

बाजारहाटासाठी पैसाही नाही. कसं जगायचं? कनाती करून उभ्या केलेल्या तात्पुरत्या झोपड्यांमध्ये पावसाचे पाणी शिरले. ओल्या गाद्यावर लहान मुलं रडत रात्र काढत आहेत. पावसात भिजून अनेक मजूर आजारी पडले. उपचाराचा खर्च परवडत नसल्याने ते वेदना सहन करत आहेत. दरवर्षी शेतकऱ्यांच्या काढणीत खांदे लावणाऱ्या या मजुरांना यंदा पंधरा दिवसांच्या पावसाने अक्षरशः उपाशी ठेवले. आता पाऊस थांबून कामास सुरुवात झाली असली तरी गेलेले दिवस उपासमारीच्या काळोखात गेले, ही वेदना मजुरांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसते.

## ओला दुष्काळ...

केवळ २२१५ कोटी? हा अन्याय आम्ही सहन करणार नाही. या आंदोलनात जेष्ठ कॉ. उत्तमराव सानप, प्राचार्य कॉ. डी. जी. तांदळे, कॉ. ज्योतिराम हरकुडे, भाई मोहन गुंड, कॉ. पंकज चव्हाण, कॉ. नितीन जायभाये, गणेश मस्के, डॉ. गणेश ढवळे, प्राचार्य युवराज मुरुमकर यांच्यासह अनेक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेतकऱ्यांचा ठाम पवित्रा : ओला दुष्काळ तातडीने जाहीर करावा. प्रती हेक्टर किमान ₹१ लाख मदत द्यावी. नदीकाठच्या गावांसाठी स्वतंत्र नुकसानभरपाई जाहीर करावी. सरकारने सकारात्मक निर्णय घेतला नाही तर आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा संयुक्त किसान मोर्च्याने दिला.

## सरवर पिंपळगाव...

आहे. तसेच काही ठिकाणी शाळा व अंगणवाडी केंद्रांना देखील पाणी

◆ पान ४ वरून पुढे...

शिरल्याने शैक्षणिक अडथळे निर्माण झाले आहेत. पुराच्या पाण्यामुळे जनावरांचेही मोठे नुकसान झाले आहे, चाऱ्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. मोहनराव जगताप यांनी शासनाला कळविले आहे की बीड जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करावा व तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी. सरवर पिंपळगावसह इतर बाधित गावांचे पुनर्वसनासाठी आरक्षित जागेवर तत्काळ स्थलांतर करावे. प्रत्येक कुटुंबाला घर दुरुस्ती व जीवनावश्यक वस्तूंसाठी विशेष अनुदान द्यावे. शेतकऱ्यांना कर्जमाफी, बियाणे व खतासाठी स्वतंत्र पॅकेज जाहीर करावे. गावातील शाळा, अंगणवाडी, आरोग्य सुविधा व रस्ते दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर करावे अशी मागणी केली आहे. या अतिवृष्टी पहाणी दौऱ्यात सांगितले की, सरकारने बाधितांना केवळ आश्वासन न देता तातडीने ठोस मदत जाहीर करावी, अन्यथा आम्हाला आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल.

## १९६७ पूर्वीच्या...

नाही हे राजकारणा बाहेरील लोकांना माहीत नाही. तर दोन वर्षांपूर्वी लक्ष्मण हाकेने मागासवर्गीय आयोगाच्या सदस्यत्वाचा राजीनामा फडणवीसांच्या सांगण्यावरून दिलेला होता.म्हणजे हाकेना फडणवीस यांचा वरदहस्त आहे.छगन भुजबळ खूप सत्तलोभी आहेत.मंत्रिपद नसतांना ते अगदीच मलूल होतात.आपलं नैराश्य ते झाकू शकत नाहीत.त्यांना जर फडणवीसांनी मंत्रिपदाचा राजीनामा द्यायला सांगितला किंवा मंत्रिमंडळातून बडतर्फ करण्याची जाणीव करून दिली तर भुजबळांची बिशाद नाही या जी आर किंवा सरकारच्या निर्णयाविरुद्ध बोलण्याची.पण तरीही जर भुजबळ खूप जोशात मराठा ओबीसींमध्ये वाद लावत असतील,तर त्यांना फडणवीसांचीच फूस आहे,हा जरांगे पाटलांचा आरोप मग खरा वाटायला लागतो.तर लक्ष्मण हाकेंना कोणीच गाभीर्याने घेत नाही,असे म्हणतात.कारण बीड जिल्ह्याबाहेर हाकेंना कोणी विचारात नाही.पण टीव्ही पाहणाऱ्या लोकांना हे माहित नसतं.त्यामुळे,हाके किरकोळ असूनही, आणि ते सुपारीबाज नेते आहेत अशी वदंता असतानाही,त्यांच्या टीव्ही चॅनलवरील आकांडतांडव करण्याचा राज्यातील जनतेवर वाईट परिणाम होतो.कारण,जीआर बाबतीत फडणवीस खोटं बोलत आहेत, तर त्यांची ही दोन माणसं मात्र जीआर बाबतीत खरं बोलत आहेत. कारण हैदराबाद गॅझेटियर मध्ये फक्त कुणबी लोकसंख्या आहे. मराठा जातीचा गॅझेटियर मध्ये उल्लेखच नाही.याचा अर्थ मराठवाड्यातील शेती करणारा किंवा शेतमजूर किंवा भूमीहीन मराठा हा कुणबी आहे असा संदर्भ घेऊन हा दोन सप्टेंबर चा जीआर काढलेला आहे ज्याच्या आधारे १९६७ पूर्वीच्या रहिवाशी असलेल्या मराठा समाजाच्या व्यक्तीला कुणबी, मराठा-कुणबी किंवा कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र द्यावेच लागेल. त्यासाठी इतर कुठल्याही पुराव्याची गरजच नाही.पण वंशावळ जुळविने, नातेसंबंधातील व्यक्तीने शपथपत्र देणे किंवा इतर कोणताही पुरावा मागणे हा या जीआर मध्ये सरकारने केलेला फाजीलपणा आहे.पण कोणी काही स्पष्ट बोलायलाच तयार नाही.म्हणून आता तरी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मंत्री राधाकृष्ण विखे पाटील या दोन जबाबदार व्यक्तींनी कुणबी प्रमाणपत्र मिळण्यासाठी

◆ पान ४ वरून पुढे...

मराठा समाजातील व्यक्तीने तो १९६७ पूर्वी मराठवाड्यातच राहत होता, एवढेच सिद्ध करण्याची गरज असल्याचे, राज्यातील जनतेला स्पष्टपणे सांगायला हवे!,असे प्रसिद्ध केलेल्या पत्रकातून शिवाजी कवठेकर यांनी म्हटलेले आहे.

## सद्गुरू श्री...

माहिती संस्थान मठातर्फे देण्यात आली आहे. सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी संस्थान मठामध्ये साजरा होणारा हा शारदीय नवरात्र महोत्सव सोहळा भक्तांना साजरा करावा असे मार्गदर्शन माजलगाव मठाचे मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी केले आहे. शारदीय नवरात्र महोत्सवात विविध कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. रविवार, दि.२८ सप्टेंबर ते गुरूवार, दिनांक २ ऑक्टोबरपर्यंत श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांचे नवरात्र तपोनुष्ठान होणार असून प्रतिनित्य श्रीगुरूंची महापूजा, प्रसाद, दुपारी ४ ते ६ या वेळात शिवपाठ व भजन, श्रीगुरूंचे आशीर्वचन आणि शिवजागर असे कार्यक्रम होणार आहेत. सोमवार, दिनांक २२ सप्टेंबर रोजी अग्रोदक गंगापूजन कुंभोत्सव व जगन्माता अष्टभूजा मुर्तीस सिंदफणा नदीचे पाणी कलशात आणून श्रींच्या मूर्तीचा रूद्राभिषेक करून घटस्थापना करण्यात आली. तसेच दररोज सकाळी ८ वाजता, सायंकाळी ८ वाजता मंगल आरती विविध दाम्पत्यांच्या हस्ते श्रींची आरती होते. याप्रसंगी भक्तगणांनी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. याप्रसंगी मोठ्या प्रमाणात महिलांनी सहभाग नोंदविला मिरवणुकीत गाय आणि अश्वाची मिरवणूक काढण्यात आली. देवीच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. याप्रसंगी विश्वनाथ शेटे यांनी सपत्नीक देवीची पूजा व आरती केली. गुरूवार, दिनांक २ ऑक्टोबर रोजी मठाच्या परंपरेनुसार दसरा दरबार महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून त्या निमित्ताने दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. बुधवार, दिनांक १ ऑक्टोबर रोजी रात्री ८ वाजता श्री.शि.भ.प. नागेश महाराज विभूते दमईवाडीकर यांचे किर्तन होणार आहे. याचा सर्व भाविकभक्तांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री संस्थान मठ माजलगाव तर्फे करण्यात आले आहे. विजयादशमी गुरूवार, दिनांक २ ऑक्टोबर रोजी ८ ते १० श्री सद्गुरू मिस्कीन स्वामी संजीवन समाधी व लिंगैक्य तपोरत्नं प्रभु पंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांचे समाधीस रूद्राभिषेक पुजा १० ते १ श्री गुरूंची महापूजा, दुपारी महाप्रसादानंतर सायंकाळी ६:३० वाजता श्रीगुरूंची रजत पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे. रात्री ८ वाजता दसरा दरबात धर्मसभा होणार असून श्रीगुरूंच्या आशीर्वचनाने या शारदीय नवरात्र महोत्सवाची सांगता होणार आहे. या दसरा महोत्सवास माजलगावसह बीड, परभणी, नांदेड, छत्रपती संभाजीनगर, धुळे, चाळीसगाव, गेवराई, साखरा, बहाद्दरपुरा, पेठशिवणी, इसाद, पिंगळी, लवुळ, कवडगाव, न्यायडोंगरी, मंगरूळ, दिंद्रुड, बोरगाव, धनेगाव, नायगाव, केसापुरी, नरवाळ, बोरविहीर, राहटी आदी भागातून शेकडो भाविकांनी हजेरी लावतात. सर्व भक्तांनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती दर्शवावी, असे आवाहन शारदीय वीरशैव तरूण नवरात्रोत्सव समिती संस्थान मठ, माजलगावच्या वतीने करण्यात आले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# अंबाजोगाई आणि केजमध्ये 'नमो उद्यान' उभारणीसाठी प्रत्येकी एक कोटींचा निधी

## आ. नमिता मुंदडा यांचे यशस्वी प्रयत्न, आधुनिक व सुसज्ज उद्यानांची सुविधा उपलब्ध होणार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई नगर परिषद आणि केज नगर पंचायतला नमो उद्यान योजनेअंतर्गत प्रत्येकी १ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. राज्य शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार नगर परिषद आणि नगर पंचायतींमध्ये नागरिकांना आधुनिक व सुसज्ज उद्यानांची सुविधा उपलब्ध करण्यासाठी हा निधी दिला जाणार आहे. या योजनेत केज मतदार संघाचा सम ावेश होण्यासाठी आ. नमिता मुंदडा यांनी प्रयत्न केले होते.



राशासनाने नुकताच जाहीर केलेल्या विशिष्ट कामांकरिता विशेष अनुदान या योजनेअंतर्गत राज्यातील नगरपरिषद व नगरपंचायतींना निधी वितरित करण्यात आला आहे. त्यामध्ये अंबाजोगाई नगर परिषद आणि केज नगर पंचायत यांचा समावेश असून, प्रत्येक उद्यानावर एक कोटी रुपयांचा खर्च होईल.या उद्यानांना नमो उद्यान असे नाव दिले जाणार आहे. विकसित झाल्यानंतर या उद्यानांची राज्यस्तरीय स्पर्धा घेतली जाईल. यात प्रथम क्रम ांकाचे उद्यान ठरल्यास संबंधित संस्थेला पुढील कामांसाठी ५ कोटींचा निधी मिळणार असून दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकाच्या उद्यानांना अनुक्रमे ३ कोटी आणि २ कोटी रुपयांची अतिरिक्त मदत मिळणार आहे. या निर्णयामागे केज विधानसभा मतदारसंघाच्या आम दार नमिता मुंदडा यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा महत्त्वाचा ठरला आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळे केज आणि अंबाजोगाई या दोन्ही ठिकाणी नागरिकांसाठी हरित, स्वच्छ व आकर्षक उद्यानांची सुविधा उपलब्ध होणार आहे. स्थानिक पातळीवर नागरिकांच्या विश्रांती, मुलांच्या खेळासाठी जागा तसेच आरोग्यवर्धक वातावरण निर्माण करण्यासाठी या योजनेचा मोठा उपयोग होईल. ग्रामीण भागातील नगरपंचायतींना अशा स्वरुपाची सुविधा मिळणे ही एक महत्वाची पायरी मानली जात आहे. अंबाजोगाई आणि केजचा या योजनेत समावेश केल्याबद्दल आ. नमिता मुंदडा यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित पवार, मंत्री पंकजाताई मुंडे यांचे आभार मानले आहेत.

## थोडक्यात...

### लातूर जिल्ह्यातील शाळांना आज रोजी सुट्टी जाहीर

लातूर । प्रतिनिधी

हवामान खात्याने लातूर जिल्ह्यासाठी २७ सप्टेंबर २०२५ रोजी पावसाचा रेड अलर्ट जारी केला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी लातूरच्या जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी लातूर जिल्ह्यातील सर्व अंगणवाडी, सरकारी व खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळा, जिल्हा परिषद शाळा, नगरपालिका शाळा, अनुदानित व विना अनुदानिक शाळा, सर्व आश्रम शाळा, सर्व महाविद्यालय, खाजगी शिकवणी तसेच आयुक्त व्यवसाय व प्रशिक्षण केंद्र यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्थांना दि. २७ सप्टेंबर, २०२५ रोजी सुट्टी जाहीर केली आहे.

### बीड येथे होणाऱ्या महा एल्गार सभेला उपस्थित राहावे: अशोक रासवे



माजलगाव । प्रतिनिधी

ओबीसी समाजाच्या न्याय हक्कासाठी मा.ना.छगनराव भुजबळ यांच्या बीड येथे होणार्या महा एल्गार सभेला ओबीसी बांधवांनी मोठया संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान मोठेवाडी येथील सामाजिक कार्यकर्ते अशोक रासवे यांनी केले आहे. दि.२८ सप्टेंबर रविवार रोजी दुपारी ४:०० वाजता बीड येथील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण, छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे ओबीसी समाजाच्या न्याय हक्कासाठी मा.ना.छगनराव भुजबळ यांची महा एल्गार सभा आयोजित केली आहे. या सभेला सर्व ओबीसी बांधवांनी मोठया संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान मोठेवाडी येथील सामाजिक कार्यकर्ते अशोक रासवे यांनी केले आहे.

### माजलगाव मध्ये भ्याड हल्ला झालेल्या पवन करवर यांची माजलगाव समता परिषद कार्यकर्त्यांनी घेतली भेट



माजलगाव । प्रतिनिधी

लक्ष्मण हाके यांचे विश्वासू पवन करवर हे माजलगाव येथील सावरगाव फाट्यावरील हॉटेलमध्ये जेवण करत असताना काही अज्ञात व्यक्तीने त्यांच्यावर भ्याड हल्ला केला त्यामध्ये ते गंभीर जखमी झाले त्यांना परभणी येथील परभणी आशुव हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले भयभीत झालेल्या पवन करवर व त्यांच्या कुटुंबीयांना माजलगाव येथील समता परिषदेच्या कार्यकर्त्यांनी भेट घेऊन धीर दिला यावेळी समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ॲड. सुभाष राऊत यांना फोन करून पवन करवर व त्यांच्या कुटुंबीयांना सर्व समता सैनिक आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे राहतील आश्वासनही समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ॲड. सुभाष राऊत यांनी दूरध्वनीवरून दिले यावेळी माजलगाव समता परिषदेचे तालुकाध्यक्ष जगन खेत्रे, संतोष रासवे आनंत आढाव मच्छिंद्र आढाव अशोक रासवे यांच्या माजलगाव तालुक्यातील बहुतांश समता सैनिक उपस्थित होते.

### महापुरामुळे शेतकऱ्यांच्या सौर पंपांचे मोठे नुकसान: नुकसान भरपाईची मागणी

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील अनेक भागात गेल्या काही दिवसांपासून झालेल्या अतिवृष्टीमुळे नद्या, नाले तुडुंब भरून वाहत आहेत. या म हापुरामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले असून सिंदफना नदीला आलेल्या महापुराचा मोठा फटका परिसरातील शेतकऱ्यांना बसला आहे. याच पार्श्वभूमीवर गट क्रमांक ९५२ मध्ये शेतकरी बाबासाहेब दामू कातखडे यांच्या शेतात बसवण्यात आलेला सौर पंप महापुराच्या पाण्यात वाहून गेला आहे. कातखडे यांच्या शेतात अल्ट्राटेक एनर्जी कंपनीचा आधुनिक तंत्रज्ञानाचा सौर पंप बसवण्यात आला होता. शेतीला सिंचनासाठी हा पंप उपयोगी ठरत होता. मात्र नदीला आलेल्या प्रचंड पुराच्या लाटांमुळे संपूर्ण पंप वाहून गेल्याने शेतकऱ्यांना मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागले आहे. सौर पंपाच्या नुकसानीम ुळे पुढील हंगामात पिकांना पाणी देण्याचे संकट निर्माण झाले आहे. सरकारने या नुकसानीचा योग्य पंचनामा करून शेतकऱ्याला न्याय द्यावा, तसेच तातडीने मदत मिळावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. प्रशासनाने याकडे सकारात्मक दृष्टीने पाहून तत्काळ मदत घ्यावी अशी शेतकरी वर्गातून मागणी केली जात आहे.

# आष्टीच्या उजाड संसारांना सप्तरंगी किट

## आम्ही शेतकऱ्यांची पोर, वाहक म्हणून कर्तव्य बजावले : अरबाज पठाण

बीड । प्रतिनिधी

सामाजिक सेवेचा वसा घेऊन समाजात म दतीचा विडा उचलत सप्तरंग संघटनेकडून आष्टी तालुक्यातील पूरग्रस्ताना किराणा किट वाटप करण्यात आल्या. संसार वाहूनगेलेल्या शेतकरी कुटुंबाना आधार देण्यात आला. संघटनेचे संस्थापक अरबाज पठाण यांनी सदरील उपक्रम आपण कर्तव्य म्हणून करत असल्याचे म्हटले. शेकडो कुटुंबात गेलेल्या अन्नदात्याच्या घरी काही करू शकल्याचे समाधान त्यांनी व्यक्त केले.

आष्टी तालुक्यातील शिराळा गावात सप्तरंग संघटनेकडून किराणा सामानाची किट वाटण्यात आली. यातून शेतकरी कुटुंबाना दिलासा देण्यात आला. अरबाज पठाण यांनी अनेक दानशूर व्यक्ती संस्थाना एकत्र आणून मदत मोहीम उभा केली व यातून शेकडोकुटुंबाना आधार मिळत आहे. अरबाज पठाण यांच्या सोबत युवा नेते महेश भैया आजबे, आष्टीचे नगरसेवक नाजीम भाई, अस्तक भाई , अजीम भाई मोसिन कुरेशी फैज शेख सरपंच ज्ञानेश्वर जगताप आलीम भाई, रफिक पटेल सफदर देशमुख वसीम मणियार साजेद भाई नदीम सर, समीर सरकार सोफियान मणियार आदी उपस्थित होते.

### • जिल्ह्यातली पहिली मदत मोहीम

**सप्तरंग संघटना कडून महापूर आला तेव्हाच मदत मोहिमेची घोषणा अरबाज पठाण यांनी केली. या साठी त्यांचे सर्व सहकारी साहित्य संकलन किट वर्गीकरण साठी दिवस रात्र काम ला लागली व शेकडो किट तयार करून महिना भर पुरेल एवढा शिधा पोहोच झाला. संघटनेचा हा निर्णय अनेकांना प्रेरक ठरला.**

### • अरबाज भाई अन्नदात्याचे सेवक – महेश आजबे

**समाजकारणात आणि राजकारणात अनेक संस्था संघटना पक्षकाम करतात मात्र आपत्तीच्या काळात रिकाम्या हातात हात द्यायला सर्व वेळ साधतात असे नाही मात्र आष्टीच्या नदीकाठी मोडून पडलेल्या संसारात अरबाज भाईचे हात मदतीचे वाहक ठरले. विधात्याने त्यांना निमित्त केले अन्नदाता माय**



**बाप शेतकऱ्यांचे आशीर्वाद त्यांना लाभतील असा आभार भाव युवा नेते महेश आजबे यांनी व्यक्त केला**

### ओबीसी महा एल्गार मेळाव्याला उपस्थित राहा- जगन्नाथ खेत्री

माजलगाव । प्रतिनिधी



ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते तथा समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष मा.ना.छगनराव भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थित ओबीसी समाजाच्या न्याय हक्कासाठी दि.२८ सप्टेंबर रविवार रोजी बीड येथे महाएल्गार मेळावा आयोजित करण्यात आला असुन ओबीसी बांधवांनी मोठया संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान समता परिषदेचे तालुकाध्यक्ष जगन्नाथ खेत्री यांनी केले आहे.

शासन निर्णयाच्या विरोधात राज्यातील ओबीसी बांधवांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. ओबीसी आरक्षण संपुष्टात येते की,काय या भिती मुळे ओबीसी समाजातील नागरिक आत्महत्या सारखे शेवटचे पाऊल उचलू लागले आहेत. त्यामुळे ओबीसी समाजाला धीर देण्यासाठी आणि ओबीसी समाजाचे आरक्षण स्वतंत्र व अखंडित ठेवण्यासाठी या म हाएल्गार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.या म ेळाव्याला ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते मा.ना.छगनराव भुजबळ यांच्यासह राज्यातील व राज्याबाहेरील ओबीसी नेते मार्गदर्शन करणार आहेत.म ेळाव्याला सर्व ओबीसी बांधवांनी मोठया संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान समता परिषदेचे तालुकाध्यक्ष जगन्नाथ खेत्री यांनी केले आहे.

# आठवडी बाजारात जनावरांची वाहने अडविणारे पोलिसांच्या ताब्यात; गोरक्षक असल्याचे भासवून वाहने अडवित असल्याची माहिती

केज । प्रतिनिधी

राष्ट्रीय महामार्गावर दोन युवक हे गोरक्षक असल्याचे भासवून आठवडी बाजारातून जनावरांची वाहतूक करणारी वाहने अडवून व्यापारी आणि वाहनचालकांना दमदाटी करीत असल्याची माहिती मिळाली. यानंतर पोलिसांनी दोन युवकांना ताब्यात घेतले आहे.

या बाबतची माहिती अशी की, दर गुरुवारी बीड जिल्ह्यातील साळेगाव (ता. केज) येथे जनावरांचा आठवडी बाजार भरत असतो. २५ सप्टेंबर गुरुवारी धाराशिव जिल्ह्यातील येडशी येथील व्यापारी समीर रज्जाक कोतवाल हे बाजारात जनावरांची खरेदी करून येडशीकडे जात असताना त्यांना माळेगांव येथील शिवाजी चौकात दोन युवकांनी त्यांचा टेम्पो अडविला आणि त्यांना दमदाटी करून ते गोरक्षक असल्याचे सांगितले. नंतर समीर कोतवाल जनावरासह टेम्पो पुन्हा परत साळेगाव येथील बाजारात घेऊन आले. त्याच्या वाहनात बसून ते दोन युवक देखील साळेगावच्या बाजार आले.



दरम्यान ही माहिती केज पोलिसांना कळविताचा बिट जमादार, बाबासाहेब बांगर हे साळेगाव येथे आले. परंतु टेम्पो अडविण्याची घटना ही युसुफवडगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीतील असल्याने युसुफ वडगाव पोलिसांना माहिती मि ळाल्यानंतर पोलिस कॉन्स्टेबल कारले आणि पोलिस कॉन्स्टेबल चव्हाण हे सरकारी वाहनाने साळेगाव येथे हजर झाले. युसुफवडगाव पोलिसांनी वाहने अडविणाऱ्या दोघांना ताब्यात घेऊन व्यापारी समीर कोतवाल याला सोबत घेऊन युसुफ वडगाव पोलिस ठाण्यात घेऊन गेले.

### अद्याप गुन्हा दाखल नाही

युसुफवडगाव पोलिसांकडे चौकशी केली असता अद्याप या प्रकरणी कोणी फिर्याद दिली नसल्याने गुन्हा दाखल झाला नसल्याची माहिती सहाय्यक पोलिस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे यांनी दिली आहे.

### 'ते' दोन युवक कोण ?

जनावरांच्या टेम्पो सह ते दोन युवक पुन्हा बाजारात आल्या नंतर त्यांचा संशय आल्याने बाजारात व्यापारी आणि शेतकरी यांनी त्यांना मारहाण केल्याची चर्चा सुरू आहे.

### 'त्या' दोघांनी ओळख ठेवली लपवून

उपसरपंच गणेश गालफाडे आणि राजेंद्र तिडके यांनी त्या दोन युवकानं त्यांची नावे आणि ओळखपत्र याची चौकशी

केली असता त्यांनी त्यांची नावे सांगितली नाहीत किंवा ओळखपत्र सुद्धा दाखविली नाहीत. वाहने अडवून गोरक्षक असल्याचे सांगत असलेल्या दोघा पैकी एकाचे नाव केशव रत्नपारखी (रा. बीड) आणि दुसऱ्याचे नाव पाळवदे (पूर्ण नाव सम जू शकलेले नाही) (रा.सासूरा ता. केज) असे असल्याचे समजते.

### अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना २ हजार रुपये भाऊबीज भेट

मुंबई । प्रतिनिधी

अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना दोन हजार रुपये भाऊबीज म्हणून भेट देणार असल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत कार्यरत अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांना भाऊबीज भेट म्हणून देण्यात येणार आहे. अंगणवाडी सेविका व मदतनीस या महिला व बालकांच्या संगोपनासाठी, पोषणासाठी आणि सर्वांगीण विकासासाठी महत्वाची सेवा बजावत आहेत. त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी ही भाऊबीजीची रक्कम भेट स्वरूपात मंजूर केली आहे. प्रत्येक अंगणवाडी सेविका व मदतनीस ही आपल्या समाजातील खरी 'शक्ती' असून, त्यांचा सण आनंदी व्हावा हीच आमची भूमिका आहे, असेही त्यांनी सांगितले.

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. व्ही. सी. जोशी ९ वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १४६३/२०२५

गंगुबाई भास्कर पिंगळे वि. निरंक

ज्यापेक्षा भास्कर पि. राजाराम पिंगळे हे दिनांक १५.०५.२०२१ रोजी सानप हॉस्पीटल (शिवाजी सानप ), बीड, ता.जि. बीड येथे मयत झालेल्या आहेत. आणि तसेच अर्जदार- १. गंगुबाई भ्र. भास्कर पिंगळे, वय-५८ वर्षे, धंदा : घरकाम, रा. आहेर धानोरा, ता.जि. बीड, ह. मु. जिजाऊनगर, जुना धानोरा रोड, बीड, ता.जि. बीड, २ धर्मराज पि. भास्कर पिंगळे, वय-३२ वर्षे, धंदा शेती, रा. वरील प्रमाणे. ३. योगेश पि. भास्कर पिंगळे, वय-२९ वर्षे, धंदा शेती, रा. वरील प्रमाणे.

अर्जदार कं. १ ही मयत नामे भास्कर पि. राजाराम पिंगळे यांची पत्नी असून, अर्जदार कं. २ व ३ हे मयताची मुले आहेत. मयताची आई नामे शिवाबाई भ्र. राजाराम पिंगळे हया यापुर्वीच मयत झालेल्या आहेत. मयतास मुलगी नाही. या अर्जदारां व्यतीरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत, असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/अर्जदारांना सदरहू मयत भास्कर पि. राजाराम पिंगळे यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख २१/११/२०२५ आहे.

आज दिनांक २५ सप्टेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

(ॲड. डी.डी. मस्के यांच्या मार्फत)

आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर, बीड

शिक्का (स्वाक्षरीत) क. लिपीक

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि. बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्रीमती. एस एच पाटील यांचे न्यायालयात**

किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक: ७३८/२०२५

अंजना नारायण गाडे विरुद्ध निरंक

ज्याअर्थी मयत नामे नारायण लिंबाजी गाडे दिनांक १३.०९.२०२४ रोजी औरंगपुर कुकडा. पो. पाचेगाव ता. गेवराई जि. बीड येथे मयत झालेले आहेत.

अर्जदार- १. अंजना नारायण गाडे, वय ५७ वर्षे धदा शेती, रा. औरंगपुर कुकडा, पो. पाचेगांव ता. गेवराई जि. बीड, २. वैजिनाथ नारायण गाडे, वय ३४ वर्षे धंदा शेती, रा. औरंगपुर कुकडा, पो. पाचेगांव ता. गेवराई जि. बीड, ३. संतोष नारायण गाडे, वय ३६ वर्षे धंदा शेती, रा. औरंगपुर कुकडा, पो. पाचेगांव ता. गेवराई जि. बीड, ४. शितल सुरेश काकडे, वय ४७ वर्षे धंदा शेती, रा. टाळगव्हाण, पो. राम पुरी, ता. गेवराई जि. बीड, ५. द्वारका सुदाम देवडकर, वय ४६ वर्षे धंदा शेती, रा. आडगांव ता. जि. बीड

शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरह मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार याना सदर मयत नामे नारायण लिंबाजी गाडे औरंगपुर कुकडा, पो. पाचेगांव ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल

आज रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले

पुढील तारीख : १०.१०.२०२५

(मार्फत अँड. अजय हुंबे)

आदेशावरून (स्वाक्षरीत) सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय का स्तर गेवराई

शिक्का (स्वाक्षरीत) क. लिपीक

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. आर. एस. ए. शेख, सह दिवाणी न्यायाधीश, क स्तर, बीड यांच्या न्यायालयात.**

किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक:- १३९९/२०२५

अर्जदार :- १. किरण पि. रमेश नागापुरे, वय - ३३ वर्ष, धंदा मजुरी, रा. आशा टॉकिजजवळ कॅनारा बैंक कॉलनी, बीड, ता.जि.बीड, २. शुभम पि. रमेश नागापुरे, वय-२८ वर्षे, धंदा शिक्षण, रा. वरीलप्रमाणे, ३. रुक्मीण भ्र. रमेश नागापुरे, वय २८ वर्षे, धंदा शिक्षण, रा. वरीलप्रमाणे,

विरुध्द निरंक

प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी मयत नामे तारामती भ्र. दत्तात्रय नागापुरे या दिनांक ०४/०६/२०२४ रोजी राहते घरी बीड येथे मयत झालेले असुन अर्जदार क १ व २ हे मयताचे नातु ( मयत मुलाचे मुले ) आहेत. तर अर्जदार ३ ही मयताची सुन आहे. मयताचा मुलगा नामे रमेश दत्तात्रय नागापुरे हे दि ०२.०५.२०११ रोजी संयंत झालेले आहेत. तसेच मयताचे पती देखील यापुर्वीच मयत झालेले आहेत.

अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे.

अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्यास प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक:- २४/०९/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

पुढील तारीख:- ३०/१०/२०२५.

( मार्फत विधिज्ञ: श्री एस. बी. खाडे )

आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर, बीड

शिक्का (स्वाक्षरीत) क. लिपीक

## जाहीर प्रगटन

**मा.श्रीमती. एस. डी. सोनी, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

किरकोळ दिवाणी अर्ज १४७२/ २०२५

अनिता भ्र. सतीश जाधव व ईतर विरूध्द निरंक

अर्जदार- १. अनिता भ्र. सतीश जाधव, वय ३९ वर्षे, धंदा घरकाम, रा. नेकनूर, ता. जि. बीड, २. साहील पि. सतीश जाधव, वय २१ वर्षे, धंदा - शिक्षण, रा. वरील प्रमाणे, ३. सपना पि. सतीश जाधव, वय १८ वर्षे, धंदा - शिक्षण, रा. वरील प्रमाणे, ४. सुशिला भ्र. नानाभाऊ जाधव, वय ६८ वर्षे, धंदा घरकाम, रा. वरील प्रमाणे,

विरुध्द निरंक

मागणी- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत सतीश पि. नानाभाऊ जाधव यांचा मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत सतीश पि. नानाभाऊ जाधव यांचा मृत्यु दिनांक ०२/०५/२०२४ रोजी झाला आहे. यांचा मृत्यु वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

मयत सतीश पि. नानाभाऊ जाधव यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत सतीश पि. नानाभाऊ जाधव यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २६/०९/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ३१/१०/२०२५ आहे.

(मार्फत विधिज्ञ: ॲड. एस. बी. शिंदे)

आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर, बीड

शिक्का (स्वाक्षरीत) क. लिपीक

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • शनिवार, दि. २७ सप्टेंबर २०२५ • पान ४

# उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी दिलेला शब्द पाळला : नाईकवाडे, पटेल



### • धानोरा रस्त्याच्या कामाला अखेर मंजुरी

**बीड । प्रतिनिधी**

अनेक वर्षांपासून दुर्लक्षित असलेल्या आणि हजारो नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी थेट जोडलेल्या धानोरा रोड सिमेंट रस्ता कामाला अखेर मंजुरी मिळाली असून, यासाठी ३ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. पालकमंत्री अजित दादा, माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे, माजी आमदार अमरसिंह जी पंडित यांच्याकडे या रस्ता कामाचा सततचा पाठपुरावा करणारे नगरसेवक अमर नाईकवाडे व गटनेते फारूक पटेल यांच्या सह स्थानिक नगरसेवक, विविध पक्ष संघटनांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, स्थानिक नागरिक यांच्या अथक परिणामकारक प्रयत्नांमुळे शक्य झाली आहे. नागरिकांच्या बहुप्रतीक्षित मागणीला न्याय न्याय देण्याचे काम पालकमंत्री अजितदादांनी केले आहे. धानोरा रस्ता केवळ एक मार्ग नसून, शहराला जोडणारा एक महत्त्वाचा जीवनवाहिनी आहे. धानोरा, पालवन सह इतर ४० ते ५० गावांचे दळणवळण, तसेच नव्याने उभ्या राहिलेल्या रेल्वे स्थानकापर्यंतचा हा मुख्य रस्ता, गेल्या अनेक वर्षांपासून तांत्रिक अडथळ्यांमुळे रखडला होता. रस्त्याची दयनीय अवस्था ही नागरिकांसाठी केवळ गैरसोयीचीच नव्हे, तर सुरक्षिततेचाही गंभीर प्रश्न बनली होती.

अजितदादांचा दूरदृष्टीपूर्ण निर्णय- अमर नाईकवाडे व फारुख पटेल यांनी थेट उपमुख्यमंत्री अजित पवार, आमदार धनंजयजी मुंडे, माजी आमदार अमरसिंह जी पंडित यांच्याशी सातत्यपूर्ण संपर्क साधून या विषयावर सातत्याने पाठपुरावा केला. नागरिकांच्या अपेक्षांची जाण ठेवत, अजितदादांनी तात्काळ निर्णय घेत सदर रस्त्यासाठी तीन कोटींचा निधी मंजूर केला. त्याचबरोबर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या माध्यमातून

▶ उर्वरित पान २ वर

# बीड जिल्ह्यातील गैर कानुनी व चुकीच्या पध्दतीने ३०० ते ४०० लिफ्ट बेकायदेशीर

### सामाजिक कार्यकर्ते स्वप्निल वरपे यांनी घेतली राज्याचे मुख्यमंत्री अजित दादा पवार यांची भेट, उर्जा विभागाला देणार आहेत चौकशीचे आदेश

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील गैर कानुनी व चुकीच्या पध्दतीने ३०० ते ४०० लिप्ट बसविण्यात आलेल्या आहेत, त्यामध्ये १५ ते २० ठेकेदार व बीड जिल्ह्यतील काही वरिष्ठ अधिकारी यांची पूर्णपणे चौकशी करून यामध्ये जे दोषी आढळतील त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करून ज्या विना परवान्याच्या लिप्ट बीड जिल्ह्यात चालू आहेत; त्या तात्काळ सिल करण्यात याव्यात व



त्या ठेकेदारांचे लायसन्स रद्द करणे बाबत. स्वप्नील वरपे पाटील या सामाजिक कार्यकर्ते यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांची भेट घेतली आहे व रितसर निवेदन दिले आहे. उपरोक्त विषयी आपणास सविनय अर्ज करण्यात येतो की, बीड जिल्ह्यातील गैर कानुनी ३०० ते ४०० लिप्टचे चुकीच्या पध्दतीने बसविण्यात आलेले आहेत. त्यामध्ये काही लिप्टला एमरजन्सी रिस्की डिव्हाईस बसविलेले नाहीत. रिस्की डिव्हाईसचे काम लाईट गेल्यानंतर लिप्ट एका फ्लोअरला सोडते. ▶ उर्वरित पान २ वर

# बीडच्या चार खेळाडूंची महाराष्ट्र अंडर-१६ संभाव्य संघात निवड

### जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या प्रयत्नांना यश

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा क्रीडा क्षेत्रात नावलौकिक असलेल्या बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या चार खेळाडूंनी आपली छाप पाडत महाराष्ट्र अंडर-१६ संभाव्य संघात स्थान मिळवले आहे.

एप्रिल महिन्यात झालेल्या महाराष्ट्र अंडर-१६ निमंत्रितांच्या स्पर्धेत बीड संघाकडून राजन कवठेकर, शौर्य जाधव, कृष्णा बिडवे व कृष्णा गायकवाड यांनी उल्लेखनीय कामगिरी केली होती. त्यांच्या मेहनतीसोबतच असोसिएशनच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या चौघांची निवड झाली आहे. क्रिकेट हा देशातील सर्वाधिक लोकप्रिय खेळ असून, या स्तरावर प्रचंड स्पर्धा असते. अशा पार्श्वभूमीवर बीडसारख्या जिल्ह्यातून एकाच वेळी चार खेळाडूंची निवड होणे ही मोठी कामगिरी मानली जात आहे. या यशाबद्दल बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. भारत भूषण क्षीरसागर, डॉ. योगेश क्षीरसागर, सचिव डॉ. अमीर सलीम यांच्यासह महेश वाघमारे, ड. राजन साळवी, इरफान कुरेशी, प्रा. जावेद पाशा, मनोज जोगदंड, रिजवान खान, शुभम धूत, संजय उडान, जलील अन्सारी, प्रा. विष्णू सोनवणे, सुनील गोपी शेट्टी, गोपाल गुरखुदे, शेख आरेफ, सरफराज मोमीन, अतिक कुरेशी,

▶ उर्वरित पान २ वर

# पुरस्थितीमुळे राज्यसेवा पुर्व परीक्षेची तारीख पुढे ढकला

### खा.बजरंग सोनवणे यांचे लोकसेवा आयोगाच्या सचिवांना पत्र

**बीड । प्रतिनिधी**

मागील काही दिवसांपासून मराठवाड्यात पुरपरस्थिती आहे. यामुळे अजूनही नद्यांना पाणी असल्याने जनजीवन विस्कळीत झालेले आहे. शिवाय हवामान विभागाने पावसाचा अंदाजही वर्तविला आहे. यामुळे दि.२८ सप्टेंबर रोजी होणाऱ्या राज्यसेवा पुर्व परीक्षेला परिक्षार्थींना जाता येणार नाही. यामुळे ही परीक्षेची तारीख पुढे ढकलण्यात यावी, असे पत्र खा.बजरंग सोनवणे यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सचिव यांना दिले आहे. पत्रात म्हटले आहे, येत्या २८ सप्टेंबर रोजी होणाऱ्या राज्यसेवा पूर्व परीक्षेसंदर्भात एक महत्त्वाचा मुद्दा निदर्शनास आणून देणे अत्यावश्यक आहे. हवामान विभागाने दिलेला सतर्कतेचा इशारा आणि मराठवाड्यातील सध्याची पूरस्थिती अत्यंत गंभीर आहे. अनेक गावे व शहरे पाण्याखाली असून वाहतूक व्यवस्थाही पूर्णत: विस्कळीत झाली आहे. या आपत्तीमुळे विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रांवर पोहोचणे ही मोठी समस्या निर्माण झाली आहे. नैसर्गिक आपत्तीच्या पार्श्वभूमीवर अनेक विद्यार्थी आपल्या तयारीनिशी परीक्षेला बसण्यास इच्छुक असले तरी प्रत्यक्ष परिस्थितीमुळे त्यांना संधी न मिळणे हे अत्यंत अन्यायकारक ठरेल. समान संधी मिळावी ही ▶ उर्वरित पान २ वर

# उपासमारीच्या छायेत मजुरांचे जगणे : पावसाने हिरावला घास ; आता पावसाने उघडीप दिल्याने सोयाबीन काढणीला सुरुवात

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

पावसाने शेतसारा भिजला, शेतकऱ्यांचे नुकसान झाले, पण या पावसाने मजुरांच्या तोंडचा घासच हिरावून घेतला. लिंबागणेश महसूल मंडळात सोयाबीन काढणीसाठी आलेल्या शेकडो मजुरांची पंधरा दिवसांपासून उपासमार सुरू आहे. गुडघाभर पाण्यात सडून पडलेल्या सोयाबीनकडे पाहून शेतकरी हताश तर मजूर हवालदिल झाले. रोजंदारी थांबल्याने त्यांच्या घरी



धान्याचा दाणा नाही. हिंगणगाव (ता.गेवराई) येथील मजूर दिनेश रावसाहेब जाधव डोळ्यात अश्रू आणून म्हणाले – मुलांच्या पोटात घास नाही. हाताला काम नाही.

▶▶ उर्वरित पान २ वर

# ओला दुष्काळ जाहीर करुन तातडीची मदत द्या : संयुक्त किसान मोर्च्याचे आंदोलन

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले असून शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. तरीदेखील शासनाने आजवर ओला दुष्काळ जाहिर न करणे व प्रती गुंठा अवघे ८५ रुपये मदत जाहीर करणे ही शेतकऱ्यांची क्रूर थट्टा असल्याचा आरोप संयुक्त किसान मोर्च्याने केला. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयासम ोर तीव्र आंदोलन छेडण्यात आले. शासनास मागण्यांचे निवेदन प्रमुख पदाधिकाऱ्यांनी



जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सादर केले.

प्राचार्य कॉ. डी. जी. तांदळे म्हणाले की, सरकारने असंवेदनशीलता सोडून ओला दुष्काळ जाहीर करावा. प्रती हेक्टर किमान १ लाख रुपयांची तातडीची मदत देऊन शेतकऱ्यांना आधार द्यावा. तसेच नदीकाठच्या गावांना वेगळी नुकसानभरपाई द्यावी. आंदोलनात महाराष्ट्र राज्य किसान सभा, भारतीय कम्युनिस्ट पक्ष, शेतकरी कामगार पक्ष, कॉंग्रेस किसान सेल, संभाजी ब्रिगेड, आम आदमी पक्ष, शिव संग्राम, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, इंटक, माहिती अधिकार संघटना, मराठा महासंघ, पत्रकार संघ, शिक्षक संघ, सामाजिक संस्था अशा विविध पक्ष-संघटना सहभागी झाल्या. नेत्यांनी संतप्त शब्दात सरकारवर टीका केली की, २०२७ च्या कुंभमेळ्यासाठी तब्बल १२ ते १४ हजार कोटींची तरतूद होते, पण कोलमडलेल्या शेतकऱ्यांसाठी

▶ उर्वरित पान २ वर

# सरवर पिंपळगाव या गावाचे तात्काळ पुनर्वसन करावे : मोहनराव जगताप



**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील सरवर पिंपळगाव, गंगामसला, सुरुमगाव, गुंजथडी या गावांमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेती, घरे व जनजीवनाचे प्रचंड नुकसान झाले आहे. या गावांचा काल दि. २५ रोजी दौरा करून नुकसानीची पाहणी केली यावेळी मोहनराव जगताप यांनी तात्काळ मदत व पुनर्वसनाची मागणी केली. शेतातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. अनेक कुटुंबांची घरे पाण्याखाली गेली असून घरगुती साहित्य, धान्य व जनावरांचे खाद्य वाहून गेले

▶ उर्वरित पान २ वर

# १९६७ पूर्वीच्या रहिवाशाला कुणबी प्रमाणपत्र मिळायलाच पाहिजे!– शिवाजी कवठेकर

**बीड । प्रतिनिधी**

१९६७ पूर्वीचा मराठवाड्यातील रहिवाशी असलेल्या मराठा समाजाच्या व्यक्तीला कुणबी, मराठा-कुणबी किंवा कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र मिळायलाच पाहिजे!, असाच या दोन सप्टेंबरला काढलेल्या जीआरचा स्पष्ट अर्थ आहे.पण तरीही मुख्यमंत्री मात्र ज्यांच्या नोंदी मिळतील, त्यांनाच प्रमाणपत्र मिळेल असे सांगत आहेत.देवेंद्र फडणवीस यांच्या या राजकीय धूर्तपणाचा निषेध करावा तेवढा थोडा.कारण, त्यांच्या या खोट्या वक्तव्याचा आधार घेऊन मंत्री छगन भुजबळ व लक्ष्मण हाके सारखे लोकं मराठा व ओबीसी मध्ये तेढ वाढवत आहेत, असे आरक्षण बचाव आंदोलन समितीच्या वतीने प्रसिद्ध केलेल्या पत्रकात अध्यक्ष शिवाजी कवठेकर यांनी म्हटलेले आहे.

पत्रकात पुढे म्हटले आहे की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा हा धूर्तपणा आहे, असे म्हणण्याचे कारण म्हणजे दोन सप्टेंबरला जीआर काढून सरकारने मराठवाड्यात हैदराबाद गॅझेटियर लागू केले आहे. ज्या गॅझेटियरमध्ये जातींच्या लोकसंख्येची नोंद आहे, कुठल्याही जातीच्या माणसाची व्यक्तिगत नोंद नाही.मग अशा परिस्थितीत कुठल्याही मराठा समाजाच्या व्यक्तीची कुणबी म्हणून नोंद मिळण्याचे काही कारणच नाही. पण तरीही देवेंद्र फडणवीस मात्र ज्याची नोंद मिळेल त्यालाच प्रमाणपत्र मिळेल असेच धादांत खोटे बोलत आहेत.आणि ते असे खोटे बोलत असल्यामुळे मराठा ओबीसी समाजामध्ये तेढ वाढत आहे.याचे त्यांना भान नाही असेही म्हणता येत नाही. कारण विचार न करता ते कुठलीही कृती करत नाहीत असे त्यांच्याबाबत सांगितले जाते. म्हणजे मग दोन सम ाजामध्ये तेढ वाढवुन राज्य अशांत करण्याचा हेतू मुख्यमंत्र्यांचा असेल का? असा प्रश्न निर्माण होतो.पण त्यात त्यांचा फायदा काय? फायदा त्यांनाच माहित. पण जी दोन माणसं या जीआर वरून रान उठवत आहेत, त्या दोन्ही नेत्यांचे फडणवीसांशी सख्य असल्याचे लोकांना माहित आहे. त्या दोन व्यक्ती म्हणजे, मंत्री छगन भुजबळ व प्रा लक्ष्मण हाके. कारण, भुजबळांना फडणवीस यांनी मंत्री केलेले आहे, अजित पवारांनी

▶ उर्वरित पान २ वर

## थोडक्यात...

# जिल्हाधिकारी कार्यालयात आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिन संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात माहिती अधिकार अधिनियमाविषयी जनजागृती करण्यासाठी माहिती अधिकार दिन संपन्न झाला. यावेळी अपर जिल्हाधिकारी हरिष धार्मिक, (सामान्य प्रशसनाचे.) उपजिल्हाधिकारी शैलेश सुर्यवंशी, रोजगार हमी योजनेचे उपजिल्हाधिकारी अभ्युदय मूळे, ङ शाहदेव ननवरे, तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी विविध विभागांचे अधिकारी तसेच माहिती अधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी माहिती अधिकार कायद्याचे महत्त्व, त्याची अंमलबजावणी आणि नागरिकांना योग्य वेळेत माहिती द्यावी, माहिती अधिकाराचे अर्जाचे प्रथमत: वाचन करुन, सामान्य व्यक्तीचे २० टक्के म्हणने ऐकुण घ्यावे त्यावर कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले तर आपणास १०० टक्के काम केल्याचे समाधान वाटेल. उरलेले ८० टक्के काम सहजगतीने होईल, जो खरा गरजवंत आहे त्याला माहिती देण्याला प्रधान्य दिले तर आपण आपले कर्तव्य पार पाडल्याचे समाधान आपणास मिळेल, असे अपर जिल्हाधिकारी हरीष धार्मिक यावेळी म्हणाले. सर्व विभागांना माहिती अधिकार कायद्यानुसार येणाऱ्या अर्जांची तत्परतेने आणि पारदर्शक पद्धतीने कार्यवाही करण्याच्या सूचनाही श्री. धार्मिक यांनी दिल्या.तसेच जनतेला या कायद्याबद्दल अधिक माहिती मिळावी यासाठी जनजागृती कार्यक्रम राबवण्यावरही भर देण्यात आला.

# अपर जिल्हादंडाधिकारी यांचे प्रतिबंधात्मक आदेश जारी

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हयात कायदा व सुव्यस्थेबाबत दि. २२ सप्टेंबर पासून नवरात्र उत्सव सुरु झाला असून दि. २ ऑक्टोबर २०२५ रोजी दसरा सण असून त्याच दिवशी सावरगाव घाट आणि नारायणगड दसरा मेळावा होणार आहे तसेच राजकिय पक्ष संघटनेच्या वतीने न्याय म ागण्यासाठी विविध प्रकारचे निदर्शने, अंदोलने, उपोषण,मोर्चे इत्यादी होण्याची शक्यता आहे. यामूळे अचानक घडणाऱ्या घटनावरुन व किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्याअनुषंगाने कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी यांच्याकडून प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले आहे. दिनांक २७ सप्टेंबर २०२५ रोजीचे रात्री ००.०१ वाजेपासून ते दि. ११ ऑक्टोबर २०२५ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था आबाधीत राहावी या करीता कलम ३७ (१) (३ ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे. शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूकीस लागु राहणार नाहीत व अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजूरीशिवाय १५ दिवसापेक्षा जास्त मुदतीपर्यंत अमलात राहणार नाही.

# जिल्हास्तरीय शालेय कुस्ती क्रीडा स्पर्धेत महाराणी ताराबाई विद्यालयाचा सुरज घुगे द्वितीय





**वडवणी । प्रतिनिधी**

जिल्हा क्रीडा अधिकारी बीड यांच्या वतीने बुधवार दि.२४ सप्टेंबर २०२५ रोजी शिवछत्रपती क्रीडा संकुलन बीड या ठिकाणी संपन्न झालेल्या जिल्हास्तरीय शालेय कुस्ती क्रीडा स्पर्धेत वडवणी येथील, महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता- ११ वी विज्ञान शाखेचा विद्यार्थी चि.सुरज घुगे यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. बीड जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेमध्ये १७ वर्ष वयोगटातील ६० किलो वजनी गटात चि. सुरज सुधाकर घुगे या शालेय मल्लांनी बीड,शिरूर-कासार आणि धारूर तालुक्यातील शालेय मल्लासोबतची कुस्ती जिंकून अंतिम फेरीमध्ये प्रवेश केला होता त्यांचा शालेय कुस्ती क्रीडा स्पर्धेत जिल्ह्यातून द्वितीय क्रमांक आला त्यानी महाराणी ताराबाई शाळेचे नाव जिल्ह्यामध्ये रोशन केले त्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणारे क्रीडा शिक्षक निवरकर सर यांचे या यशाबद्दल संस्कार शिक्षण मंडळाचे संस्थापक सचिव माजी आमदार केशवराव आंधळे व विद्यालयाच्या शालेय समितीचे अध्यक्ष तथा भाजपा युवा मोर्चा बीड जिल्हाध्यक्ष संजय आंधळे, वडवणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रणजीत भैय्या धस यांनी अभिनंदन केले तसेच विद्यालयाच्या वतीने संस्थेचे प्रतिनिधी तथा संचालक इंजि.अशोक भैय्या आंधळे यांच्या हस्ते शाल,श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती शोभाताई आंधळे-डोईफोडे मॅडम, उपप्राचार्य मस्के सर,पर्यवेक्षक धाईतिडक सर,हिंदी विषयाचे जेष्ठ अध्यापक डोईफोडे सर,श्री.सुनीलजी कुलकर्णी सर,श्री.प्रदीपजी काळे सर,प्रा.मुंडे सी.व्ही.,प्रा.अंडील जी.पी.,प्रा. संजयजी केदार सर यांच्यासह विद्यालयातील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी मठात शारदीय नवरात्रोत्सवाला प्रारंभ

### यंदाही विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल



**माजलगाव । प्रतिनिधी**

ऐतिहासिक परंपरा असलेल्या सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी मठ संस्थान येथे शारदीय नवरात्र महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार, दि.२२ सप्टेंबर ते २ ऑक्टोबरपर्यंत चालणार्या नवरात्रोत्सवाची सांगता दि.२ ऑक्टोबर रोजी रजत पालखी सोहळा आणि दसरा दरबाराने होणार असल्याची ▶ उर्वरित पान २ वर